● रविवार, दि. १५ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १३७ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# निधी मंजूर करुन आणल्यानंतर भूमिपूजन करतोय - आ. अर्जुनराव खोतकर

कामांचा सिलसिला असाच सुरु राहणार असल्याचा जालनेकरांना दिला विश्वास; शहरातील विविध रस्ता कामांचे भूमिपूजन










**जालना । प्रतिनिधी** - निधी आणणं हे काम काही सोपं नाही. मंत्रिमंडळाचा अजून विस्तार होणे बाकी असतांनाही आपल्या प्रयत्नांना यश आले आणि ६७ कोटी रुपयांचा निधी आपल्याला मिळाला आहे. तूर्तास आपण आज चार रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ केला असला तरी हा कामांचा सिलसिला असाच सुरु राहील, असे मत आ. अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलतांना व्यक्त केले. गोरंट्याल यांचा नाम ेल्लेख न करता यावेळी त्यांनी त्यांच्यावरही टिका केली. आपण निधी मंजूर करून आणल्यानंतर भूमिपूजन करत आहोत असेही खोतकर म्हणाले.

भांडवली गुंतवणूकीसाठी राज्याच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत जालना शहरात ६७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याच अनुषंगाने आज आयटीआय पाण्याची टाकी ते मारोती मंदिर चौक (३.४९ कोटी), रेल्वे गेट ते माँ किराणा (२.५० कोटी), पेशवे चौक ते लक्कडकोट पुलापर्यंत (१.१० कोटी), श्रीजी ढाबा ते शंकुतलानगर (२.०६ कोटी) या कामाचा आज शनिवारी आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी मार्गदर्शन करतांना आ. श्री. खोतकर बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, काही लोकांनी निधीची वाट न पाहताच भूमिपूजन उरकुन घेतले असले तरी आपण तसे करणार नाही. अगोदर निधी मंजूर करुन आणला आणि नंतर भुमिपूजन केले आहे. सकाळी प्रथम प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतले आणि कामाला सुरुवात केली. आपण आपल्या कामाचा हा सिलसिला असाच सुरु ठेवणार आहोत, मंत्री मंडळ विस्ताराबाबत बोलतांना आ. खोतकर म्हणाले की, मला याबाबत काहीच माहित नाही परंतू आमचे नेते एकनाथराव शिंदे हे जो निर्णय घेतील, तो आपल्याला मान्य राहिल, असेही आ. खोतकर यांनी यावेळी सांगितले.

यावेळी युवा सेनेचे सचिव अनिरुध्द खोतकर, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, संपर्क प्रमुख पंडीतराव भुतेकर तसेच गणेश सुपारकर, आत्म ानंद भक्त आदींसह भाऊसाहेब कदम, बाबासाहेब इंगळे, फिरोजलाला तांबोळी, गणेश मोहिते, दिनेश भगत, पांडुरंग डोंगरे, राहुल हिवराळे, प्रदीप गायकवाड, अमोल ठाकुर, बाबुमामा जाधव, विजय जाधव, दशरथ तोंडूळे, योगेश रत्नपारखे, माधु गायकवाड, प्रमोद पवार, संतोष परळकर, संदीप साबळे, किशोर शिंदे, जाफर खान, राजू गायकवाड, **पान २ वर**

युवा आदर्श

## दत्तात्रया ...

दत्त माझा मी दत्ताचा
जळीस्थळी तुजपाही
संकट येई परत जाई
काही मले कळे नाही
पालखी तव खांद्यावर
भार अवजड तूचं वाही
सोडवे कष्टांतून सहज
म्हणालो ना त्राहीत्राही
जप तप उपवास नसे
सेवा कधीही नीटनाही
असेकाय मी भले केले
पुण्यत्वांची देशीग्वाही
सहज करे संगम स्नान
शमली अंग लाहीलाही
आच्छादन आम्हांवरती
कुपाछत्र दत्तात्रय माही
कळत नकळत गुरुवर्या
पुष्पमाला तुजला वाही
पातके केली वेळोवेळी
ओसंडू राही खाते वही
गुरूचरित्र कथा माधुर्य
निनाद वाजे दिशादाही
अवतरणी का वाचताना
दयाघन काळजी वाही
दत्त याग नयना दिसला
अर्पिली रे समिधा व्रीही
विभूती लागली कपाळी
शांतवला उरातला वन्ही

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा झाडे जगवा



## संपादकीय

पान

### लोहपुरुष

भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज स्मृतिदिन. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास



भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

---

**पान १ वरुन**

### निधी मंजूर ...

स्वप्नील घुले, संजय पा. डुकरे, जगदीश रत्नपारखे, दिपक वैद्य, संतोष रासवे, किशोर शिंदे, प्रभाकर पवार, प्रमोद पवार, गणेश चव्हाण, सुशिल भावसार, संतोष परळकर, ताहेर खान, बबनराव मगरे, सुहास मुंडे, माधु गायकवाड, किशोर शिंदे, कुणाल जाधव, फिरदोस भाई, जाफर खान, पांडुरंग शिंदे, मनोज देवरे, किशोर शिंदे, राजू रमेश मुळे, अभिजीत गायकवाड, महेश कुलकर्णी, गोपाल काबलिये, मनपाचे बांधकाम अभियंता शेख सऊद आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

---

# चाहुल नववर्षाची-सरतं वर्ष आणि नववर्षात काय नाविन्य?

चाहुल नववर्षाची-सरतं वर्ष आणि नववर्षात काय नाविन्य?
नववर्षाच्या पूर्वसंध्येला जवळजवळ प्रत्येकच घरातले दिवे मध्यरात्रीपर्यंत सुरू असते. त्यामुळे देश रात्रीसुध्दा जागा असतो असं म्हणायला हरकत नाही. सरत्या वर्षाला निरोप देत असताना कटू-गोड आठवणींची सोबत असते. हे वर्ष खूप काही देऊन आणि शिकवून जाते. त्यामुळे हे सरतं वर्ष अनेक प्रकारे प्रेरणादायी आणि आश्चर्यकारक ठरते. याच आश्चर्यामुळे सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाचं जल्लोषात स्वागत केल्या जातं. हा सोहळा जेवढा नेत्रदीपक असतो, तेवढाच मनाला सुखावणारा आणि नवी उमेद देणारा ठरतो. पण...

ज्याप्रमाणे कोणतीही व्यक्ती जडभरीत वस्त्रांनी आणि वेगवेगळ्या सौंदर्य प्रसाधनांनी नटून-थटून चारचौघात गेल्यावर त्याला कुणीही नवं तर म्हणणार नाही ना! एवढच का जोपर्यंत त्याच्या शरीरावर जडभरीत वस्त्र व प्रसाधनं असते, तोपर्यंत तो थोडा वेगळा वाटतो. ते सर्व उतरल्यावर 'जुनं ते सोनंच' असते. अगदी त्याचप्रमाणे आयुष्यात येणारा प्रत्येक दिवस हा सारखा नसतो. असं असलं तरीही प्रत्येक दिवसात काहीतरी 'नवं' असतंच असं नाही. पण एक मात्र निश्चित त्यात 'वेगळं' काहीतरी नक्कीच असतं. आणि या वेगळेपणामुळेच उगवणारा प्रत्येक दिवस आपल्याला नवा वाटत असतो. याच वेगळेपणाचे नाविन्य ओळखले तर प्रत्येक दिवस हा नववर्षाची 'सुरुवात' ठरू शकतो.

सूर्याच्या प्रत्येक किरणाला सप्तरंग असते. ज्याला आपण 'इंद्रधनुष्य' या नावाने ओळखत असतो. या सात रंगापैकीच एक रंग स्मृतीचा असतो आणि हा स्मृतीचा रंग ज्या क्षणाला सर्वांगाने स्पर्शून जातो, तो क्षण अविस्मरणीय ठरतो. पण या रंगालाही वेगवेगळ्या छटा असतात. कधी सुखाची तर कधी दु:खाची, कधी यशाची तर कधी अपयशाची, कधी कॅन्सरची तर कधी कोरोनासारख्या व्हायरसची. पण काहीही असो, अशा क्षणामुळेच पूर्ण वर्ष अविस्मरणीय ठरत असते. म्हणूनच नववर्षाचं स्वागत करताना पाठमो-या वर्षाला विसरावं असं वाटत नाही.

**ऊन पावसाचा मिलाफ होता**
**इंद्रधनुष्य नभी दिसतो**
**सुख दु:खाचे सप्तरंग अवतरता**
**नियतीचा खेळ कळतो**

नवीन वर्ष म्हणजे विविध संकल्पाचा मुहूर्ताचा क्षण! भूतकाळाच्या अंधारात हरवलेल्या क्षणांच्या गर्ततेतून आलेली जीवनाची 'नाव' उज्ज्वल भविष्यातील स्वप्नांच्या यशाच्या किनारी लावण्याची नवी उमेद देणारा क्षण...पण स्वप्न कितीही आपुलकीनं रंगविली तरीही ते कधीच आपली होत नसतात. मानवी जीवनाची अस्थिरता आणि स्वप्नांची क्षणभंगुरता यांचं नातं कासवाच्या कवचासारखं घट्ट विणलेलं. हा त्यांचा संबंध नववर्षाच्या पहिल्या दिवशी जाणवतच नाही. पण जुनं होणा-या वर्षाकडे पाहिलं की, हे खरं वाटायला लागतं. म्हणून मग नववर्षाचं स्वप्न रंगविणे म्हणजे तळहातावरच्या आयुष्य रेषेची लांबी मोजण्यासारखं आहे. मानवी कल्पक बुद्धीचा विचार करता...

**ईश्वर साक्षी नवीन वर्षी**
**करीन प्रयत्न नव्या दमाने**
**संकल्पांच्या पुण्यतिथीला**
**संकल्पाचे स्मरण नव्याने**

सुरू होणारं नववर्ष एक वर्षानंतर जुनं होणारं असतं. पण तरीही नववर्षाचा पहिला दिवस आपल्या आयुष्यात वेगळच महत्त्व घेऊन येतो. या दिवशी उगवणारा सूर्य तोच असला तरी नववर्षाच्या 'सुखाची भूपाळी' गात येतो. त्यामुळे त्याच्या चेह-यावर एक 'पाहुणपण' जाणवतं आणि म्हणूनच अशा पाहुण्याचं स्वागत करण्याची अदम्य इच्छाशक्ती प्रत्येकाच्या चेह-यावर स्पष्टपणे जाणवते.

**इंचभराने फुगली नाही**
**यगायुगांची खोगिरभरती**
**सूर्य कारकुन रोज सारखी**
**सही ठोकतो मस्टर वरती**

नववर्षाच्या पूर्वसंध्येला मावळतीकडे निघालेल्या सूर्याला निरोप देताना मनाला लागलेली भावस्पर्शी हुरहुर तर दुसरीकडे गुलाबी बोच-या थंडीत कुडकुडत का होई ना थर्टीफर्स्ट साजरा करण्यासाठी चाललेली लगबग यामुळे निरोप आणि स्वागताचा हा एक आनंददायी 'सोहळा' होत असतो.
मावळतीच्या वर्षात केसर रंगात अर्घ्यस्नान करून सूर्य मोतीजडीत लाल जडभरीत प्रकाशमय वस्त्र परिधान करण्यासाठी क्षीतिजाआड गळप होतांना गलबलून आलेलं हळवं मन कृत्रिम रोषणाईच्या आरासीत, फटाक्यांच्या आतषबाजीत विचारांना नाविन्याचा मुलामा चढवून नव्या वर्षात समरस व्हायला लागतं. संगिताच्या मधूर स्वरात अन् ढोलताशांच्या निनादात नव्या वर्षाच्या स्वागतासाठी सर्वजन सज्ज असते.

**'सुखमय वैभवाच्या पानाफुलांनी**
**बहरत यावे नववर्ष**
**अमृतमय आनंद फळांनी**
**बहरावा जीवनवृक्ष'**

यासारख्या लक्षवेधी शब्दांच्या संगतीनं मनही हरखून जातं. येणारी आव्हानं नव्या उमेदीनं पेलण्यासाठी हे नववर्ष प्रत्येकाला खुणावत असतं आणि प्रत्येकजन हे आव्हान पेलण्यासाठी आपआपल्या परीने तयार होत असतो आणि प्रत्येकाला सांगत असतो...

**गेले दिवस विसरूनिया**
**करा स्वागत नववर्षाचे**
**पाऊल उचला न डगमगता**
**नव कल्पीत आशेचे**

**सुनील शिरपुरे, कमळवेल्ली, यवतमाळ, ७०५७१८५४७९**

---

# खासदार महोत्सवाच्या निमित्ताने साहित्य, कला, क्रिडा व संस्कृतीचा महासंगम

नागपूरमध्ये खासदार महोत्सवाची सुरुवात २०१६ पासून झाली.त्यानिमित्याने दरवर्षी नागपूरमध्ये खासदार महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केल्या जातो.त्याचप्रमाणे याही वर्षी दिनांक १३ डिसेंबर २०२४ पासून खासदार महोत्सवाला सुरुवात होत आहे व विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून देशाच्या संस्कृतीचे दर्शन दिनांक २२ डिसेंबरपर्यत सर्वांनाच पहायला मिळेल. यापध्दतीने कार्यक्रमाचे आयोजन केंद्रीय मंत्री माननीय नितीनजी गडकरी यांनी नागरिकांसाठी आयोजित केलेले आहेत याकरिता त्यांचें मनापासून स्वागतच. याकार्यक्रमात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.यात मुख्यत्वे करून महाराष्ट्रासह भारतीय संस्कृतीचा वारसा पथनाट्याच्या माध्यमातून, गाण्यांच्या माध्यमातून व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवील्या जातो. या कार्यक्रमात मुख्यत्वेकरून संपूर्ण धर्माची जोपासना आपण कशी टीकवायची याचेही हुबेहूब चित्रिकरण पहायला मिळते. सध्या सुरू असलेल्या खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आपल्याला महाराष्ट्राचा वारसा दिसून येईल.नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची चालना देण्याचे काम माननीय श्री नितीनजी गडकरी यांनी खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आतापर्यंत दाखविले आहे.पुढेही आपली संस्कृती टिकून राहावी या उद्देशाने याहीवर्षीही आपल्याला खासदार महोत्सव पहायला मिळत आहे. सध्याच्या परिस्थितीत भारतातील अनेक राज्यांमध्ये सांस्कृतिक वारसा लुप्त होतांना दिसत आहे.परंतु विदर्भासह महाराष्ट्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सारखा पूत्र मिळाल्याने खासदार महोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतिक वारसा जिवित झाल्याचे दिसून येते. भाजपा सत्तेत असो वा नसो नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रम,कला, साहित्य, क्रिडा,सामाजिक उपक्रमांमध्ये खंबीरपणे भूमिका बजावुन आपले योगदान देत असतात.आज गडकरींच्या पुण्याईने नागपूरसह संपूर्ण भारतात उड्डाण पुलांचा बोलबाला दिसून येतो.नागपूरच्या विकासाची गोष्ट केली तर आज नागपुरचा संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते.हीबाब संपूर्ण देश अनुभवत आहे. नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण व केंद्रबिंदू आहे.आपातकालीन परिस्थितीत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नागपूरची निवड केली जाते.त्या अनुषंगानेच नागपूरचा विकास होत असावा. विदर्भाला संतांची भूमी म्हणून सुद्धा ओळखले जाते.संत, थोर महात्म्यांच्या आचार विचारांची जपणूक हीच खरी संस्कृती होय.आज आपली संस्कृती काय आहे हे सर्वांनाच माहीत आहे. परंतु गडकरींच्या अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील संस्कृती जोपासण्याचे कार्य होत असल्याचे दिसून येते.आजच्या पिढीला मोबाईलमुळे व सोशल मीडियामुळे आपल्या संस्कृतीचा विसर पडत असल्याचे दिसून येत आहे. परंतु नवीन पिढीला सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती किंवा देशाची संस्कृतीचे जतन कसे करावे याची माहिती अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मिळते. खासदार महोत्सवाच्या अनुषंगाने आपल्या संस्कृतीला जिथे-कुठे खिंडार पडले असेल.त्याला दुरुस्त करण्याचा विडा गडकरींनी घेतल्याचे दिसून येते.१९४७ नंतर नागपूरमध्ये अनेक खासदार होवून गेले.परंतु गडकरींचा काळ हा वाखाणण्याजोगा आहे.कारण खरोखरच महाराष्ट्राचा व देशाच्या विकास मार्ग मोकळा करणारा आणि सांस्कृतिक वारसा टिकविणारा हा काळ असल्याचे दिसून येते.ज्या दिवसापासुन गडकरीजी खासदार झाले तेव्हा पासून त्यांचा कामाचा सपाटा जोरदार सुरू आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कामाची चर्चा भारतातच नाही तर संपूर्ण जगभरात प्रसिद्ध आहे म्हणूनच त्यांना विकासपुरुष म्हणून ओळखल्या जाते. ही नागपूरकरांसाठी,महाराष्ट्रासाठी व देशासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे.गडकरींनी विकासाची सुरूवात उड्डाण पूलापासुन केली ती आज विकासाच्या शिखरापर्यंत जाणवु ठेपली आहे आणि आता विकासासोबतच सांस्कृतीची जोपासना करण्याचे दायित्व त्यांनी स्वीकारल्याचे दिसून येते. यासाठी त्यांनी आपली ताकद पुर्णपणाला लावली आहे. भारतात अनेक ठिकाणी आपल्याला जातीय दंगली दिसून येतात.परंतु नागपूरमध्ये कोणतीच जातीय दंगल अथवा टोकाचे मतभेद व वाद झाल्याचे दिसून येत नाही.नागपूरमध्ये संघ कार्यालय, दीक्षाभूमी,ताजबाग,गणेश टेकडी,चर्च इत्यादी नामांकित अनेक धार्मिक पुरातन स्थळे आहेत.त्याचे जतन सर्वधर्मीय करतात. गडकरी यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांना घेऊन चालने व समाजामध्ये सर्वच धर्माविषयी आदराची भावना निर्माण करून सर्वांना एकसुत्रीत बांधून ठेवण्याचे महत्वाचे काम गडकरींनी केले आणि करीत आहेत. खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून समाज कार्यासह लोकांनी आपल्या संस्कृतीचे जतन कसे करता येईल याची जाणीव करून देण्याचे कार्य गडकरी करीत आहे. नागपुरला राजकीय दृष्ट्या संघभुमि म्हणून भारतासह जगभर ओळखले जाते.परंतु आजही नागपूरमधील हिंदू-मुस्लिम -शिख-ईसाइ-बौध्द एकोप्याने राहतात.ही नागपूरसाठी, नागपूरकरांसाठी व देशासाठी सन्मानाची बाब आहे.गडकरी नागपूरचे खासदार झाले म्हणूनच विकास झाला आणि त्यांच्यामुळेच संस्कृतीचे जतन कसे करावे याची शिकवण खासदार महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना मिळत आहे. आज गडकरींच्या कामाची शैली व एकाग्रता लक्षात घेता ते भारतासाठी विकासपुरुषआहेत. खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव पुनर्जीवीत करण्याचे काम श्री गडकरीजी करीत आहे. खासदार महोत्सवामध्ये कला, संस्कृती, साहित्य, क्रिडा, यासोबतच मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे दर्शन सुध्दा होते.श्री नितिनजी गडकरी यांच्या उपक्रमांना माझा सलाम.देशाची संस्कृती टिकवून ठेवायची असेल तर देशातील संपूर्ण राज्यांच्या खासदारांनी दरवर्षी एकदातरी सांस्कृतिक महोत्सवाचा कार्यक्रम आपापल्या क्षेत्रात घ्यायला हवा.यामुळे देशांच्या संस्कृतीची जोपासना होईल. जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी,नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

---

# परभणी घटनेचा निषेध; दोषींविरुद्ध कठोर कारवाई केली जावी - इलियास खान फलाही

**जालना । प्रतिनिधी -** जमात-ए-इस्लामी हिंद, महाराष्ट्रचे अमीर मौलाना इलियास खान फलाही यांनी महाराष्ट्रातील परभणी येथे झालेल्या दंग्यांची तीव्र निंदा केली आहे. माध्यमांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले, आम्ही परभणीतील हिंसाचाराचा निषेध करतो. भारतीय संविधानाच्या प्रतीला हानी पोहोचवणे ही चिथावणीखोर कृती आहे आणि दोषींविरुद्ध कठोर कारवाई केली जावी.

दुख व्यक्त करताना मौलाना इलियास खान फलाही म्हणाले, परभणीत डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ ठेवलेल्या भारतीय संविधानाच्या प्रतीला हानी पोहोचवण्यामागील उद्दिष्ट स्पष्ट आहे. या लज्जास्पद कृत्याद्वारे दोषी हे दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत की संविधानाचा त्यांच्यासाठी काहीही महत्त्व नाही आणि ते जे काही करायचे ठरवतील ते करू शकतात, कायदा त्यांच्याविरोधात काहीही करू शकत नाही.

ते पुढे म्हणाले की, अशा घटना अनेकदा घडतात कारण अशा मानसिकतेच्या लोकांना कायद्याचा कोणताही धाक वाटत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे प्रशासन अशा गटांविरुद्ध वेळेवर कठोर कारवाई करण्यात अपयशी ठरत आहे. परिणामी, परिस्थिती




अनेकदा नियंत्रणाबाहेर जाते आणि हिंसाचार भडकतो. पोलिस आणि तपास यंत्रणांनी आपली कार्यक्षमता सुधारून जनतेचा विश्वास पुन्हा निर्माण करणे गरजेचे आहे.

मौलाना फलाही यांनी जनतेला संयम आणि धैर्य ठेवण्याचे आवाहन करताना सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत शांतता आणि सुव्यवस्था राखणे आपले प्राधान्य असले पाहिजे. ते म्हणाले, संविधानाच्या प्रतीला हानी पोहोचवणे ही एक लज्जास्पद कृती आहे, पण हिंसा हा कोणत्याही समस्येचा उपाय नाही. गरज आहे की जिल्हा प्रशासन परिस्थिती प्रभावीपणे हाताळेल, दोषींना त्वरित अटक करून त्यांची चौकशी करेल आणि असे संविधानविरोधी आणि हिंसक वातावरण निर्माण करणारे असामाजिक घटक कोण आहेत, हे उघड करेल.

मौलाना यांनी शहरातील बुद्धिजीवी, राजकीय नेते आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित लोकांना आवाहन केले की ते एकत्र येऊन संविधानविरोधी मानसिकता आणि विचारधारेला रोखण्यासाठी पुढाकार घ्यावा.

---

# परिवर्तन संकल्प मित्र मंडळातर्फे आज श्री माळाचा गणपती मंदिरात महाप्रसादी



**जालना । प्रतिनिधी -** परिवर्तन संकल्प मित्र मंडळाच्यावतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी रविवार दि. १५ डिसेंबर रोजी दुपारी १२ ते ३:३० या वेळेत अहंकार देऊळगाव येथील श्री माळाचा गणपती मंदिरात महाप्रसादीचे आयोजन करण्यात आले आहे.
गेल्या १४ वर्षापासून महाप्रसादीचे आयोजन करण्यात येत आहे. भाविकांनी महाप्रसादीचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन परिवर्तन संकल्प ग्रुपचे समित श्रीश्रीमाळ, आशिष बोरुंदिया, रजत अग्रवाल, प्रणाम बोरुंदिया, शिवम लाहोटी, आशिष गेलडा, श्रेयस शर्मा, आनंद भारजवाल, आदेश बोरुंदिया, जितेश तलरेजा, कपील चौधरी, महेंद्र बोहंदिया, विजय श्रीश्रीमाळ, कुशल बोरुंदिया, सुनित दर्डा, दिनेश भगत, दिनेश छाजेड, अनुप राठी, मनोज भगत, सागर चव्हाण, विनोद भगत, धिरज पटेल, कैलाश भरतिया, विपुल सुराणा, रोहित चव्हाण, सौरभ भक्कड, रौनक भक्कड, मनोज दाड, नारायण अग्रवाल, निरज ओस्तवाल, नरेंद भगत, वैभव शर्मा, धिरज भगत, स्नेहल श्रीश्रीमाळ, संतोष सकलेचा, प्रदीप गेलडा, शुभम जटावाले विरेंद्र ठोले, अभिजीत लाहोटी, हेमंत जैन, विशाल बनवट, परेश सिंगी, देवेश शर्मा, चेतन कटोटीवाले, यश गादिया, संदेश बोरुंदिया, तुषार श्रोत्रिय, चरण पाटील, राहुल जटावाले, अर्जुन भगत, सुनिल नंद, सेवक नारियलवाले, कमलेश कड, राजेश कांबळे, सुदर्शन लोढा, शुभम बाठिया, अक्षय मंत्री, शुभम अग्रवाल, अजिंक्य अग्रवाल, प्रसाद भुतडा, शुभम झांझरिया, आशिष राठी, रोमित मालपाणी, गणेश काबरा, मयुर बिर्ला, प्रतिक सोमानी, यश तवरावाला, नितीन राठी, हर्षल काकडे, विकास श्रीपत, तुषार सेलुकर, सोमनाथ ठुबे अक्षय श्रीपत, प्रतिक गाडगिल, रितेश शाह, सौरभ खंदारे, अमोल फिरंगे, गजानन शिंदे, किशोर मगरे यांनी केले आहे.

# रब्बी हंगामासाठी गहू उत्पादक शेतकऱ्यांना निविष्ठांचं वाटप

## राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचं आयोजन

**जामखेड । प्रतिनिधी -** कर्जत-जामखेड मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार रोहित पवार यांच्या संकल्पनेतून बारामती ॲग्रोचे चेअरमन राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जवळके आणि पिंपळगाव उंडा या गावातील अनुसूचित जाती-जमातीतील गहू पीक उत्पादक शेतकरी बांधवांना रब्बी हंगामासाठी 'ड्उ-ड्झ प्रकल्पा'अंतर्गत निविष्ठांचं वाटप करण्यात आलं. यावेळी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना गहू पीक उत्पादन वाढीसंदर्भात विविध विषयांवर मार्गदर्शन केलं.



कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांचे वडील राजेंद्र पवार यांच्या माध्यमातून कर्जत-जामखेड मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पीक उत्पादन वाढीसाठी सातत्याने प्रयत्न केले जातात, विविध उपाययोजना राबवल्या जातात, त्यासाठी शेतीविषयक तज्ज्ञांना बोलावून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते. त्याचाच भाग म्हणून ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचालित कृषी विज्ञान केंद्र बारामती, आघारकर संशोधन केंद्र आणि कर्जत-जामखेड इंटीग्रेटेड डेव्हलपमेंट फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जामखेडमधील जवळके आणि पिंपळगाव उंडा या गावांमध्ये अनुसूचित जाती-जमातीतील गहू उत्पादक शेतकरी बांधवांना रब्बी हंगामातील निविष्ठांचं वाटप करण्यात आलं. जवळके गावातील ३५ शेतकऱ्यांना आणि पिंपळगाव उंडा येथील १५ शेतकऱ्यांना या उपक्रमातून निविष्ठा देण्यात आल्या. यावेळी रब्बी हंगामातील पीक नियोजन आणि बदलत्या हवामानातील आव्हानांवर मात करत शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी डॉ. विवेक भोईटे, आघारकर संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. विजेंद्र बाविस्कर आणि पीक रोग शास्त्रज्ञ डॉ.सुधीर नवाथे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलं. डॉ.भोईटे यांनी रब्बी हंगामातील पीक नियोजन, तूर व कांदा या पिकांवरील व्यवस्थापन व वातावरणाशी जुळवून घेत उत्पादनवाढीबाबत मार्गदर्शन केले. तसेच डॉ. बाविस्कर आणि डॉ. नवाथे यांनी गव्हाची लागवड, नवनवीन विकसित वाणांची माहिती तसेच गहू पिकावरील रोग व कीड नियंत्रण आणि त्यावरील उपाययोजनांवर शेतकऱ्यांसोबत सविस्तर चर्चा चर्चा केली.

या कार्यक्रमासाठी कृषी विज्ञान केंद्र (बारामती) आणि आघारकर संशोधन केंद्राच्या तज्ज्ञांनी सहभाग घेतला तसेच जवळके विकास सहकारी सोसायटीचे चेअरमन श्री. कांतीलाल वाळुंजकर, पिंपळगाव उंडाचे माजी सरपंच मच्छिंद्र भालेराव, प्रगतशील शेतकरी सौ. साळवे, प्रकल्प समन्वयक ओंकार ढोबळी, रमेश पवार यांसह जवळके व पिंपळगाव उंडा येथील शेतकरी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. आमदार रोहित पवार यांच्या संकल्पनेतून आणि त्यांचे वडील राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या या उपक्रमामुळे अनुसूचित जाती-जमातीतील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती आणि शाश्वत शेतीकडे वळण्याची नवी दिशा मिळाली. हा उपक्रम शेतकऱ्यांच्या उत्पादन क्षमतेत वाढ करण्यास निश्चितच मदत करेल, असा विश्वास व्यक्त यावेळी व्यक्त करण्यात आला. यापूर्वीही राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत जामखेड मतदारसंघात शेतीत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात. गेली पाच वर्ष तूर , कांदा, द्राक्ष, डाळिंब, उडिद यासह विविध पिकांच्या उत्पादन वाढीसाठी त्यांनी वेगवेगळ्या कार्यशाळा घेतल्या आणि शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिलं. तसंच आवश्यक त्या ठिकाणी आभ्यास दौरे काढून आधुनिक पद्धतीने शेती करून उत्पादनात वाढ कशी करावी याबाबत मार्गदर्शन केलं आणि त्याचे दृश्य परिणाम दिसून आले आहेत. विशेषतः कांदा, तूर, उडिद या पिकांच्या बाबतीत कर्जत जामखेड मतदारसंघात अमुलाग्र बदल होऊन मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी उत्पादनात वाढ केली आहे. हे सर्व सर्वस्वी राजेंद्रदादा पवार यांचं मार्गदर्शन आणि शेतकऱ्यांनी घेतलेली मेहनत याचं हे यश आहे.

# बस आयशरची धडक; तीन जण ठार, २० जण जखमी

## नाव्हा जवळ घडली घटना

**जालना । प्रतिनिधी -** मालेगावहून जालना मार्गे माहूरगडला जाणाऱ्या बस आणि आयशरची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. ही घटना शनिवार (दि १४) रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास नाव्हा शिवारात घडली. या घटनेत तीन जण ठार झाले असून २० जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. जखमींना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांच्या मोठ्या टीम कडून या जखमींवर युद्धपातळीवर उपचार सध्या सुरू आहेत मात्र यामध्ये जे जखमी आहेत त्यांची नावे सध्या कळू शकलेले नसून सदर अपघाताचा तपास पोलीस यंत्रणा करत आहे.



जालन्याजवळ एका बसला अपघात झाला आहे.आयशर ट्रक आणि बसची समोरा समोर धडक होऊन हा अपघात झाला. या बस मध्ये ६० ते ६५ परवासी बसलेले होते. दोन्ही गाड्या रॉंग साईटने जात असल्यामुळे हा अपघात घडला.

या अपघातात ३ प्रवासी ठार झाले असून १ते २० जण जखमी झाले आहेत.ही बस मालेगावहुन जालना मार्गे माहूरगडला जात होती.मात्र जालन्यातील नाव्हा शिवारात आयशर ट्रक आणि बस यांचा समोरा समोर अपघात झाला यात ३ जण ठार तर १५ ते २० जण जखमी झालेत.दरम्यान हा अपघात घडताच स्थानिकांनी तातडीने रुग्णवाहिका बोलावून बचाव कार्य सुरू केले. त्यामुळे जखमींना शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. हा अपघात ईतका भीषण होता की, अपघातात आयशर आणि बसचा चक्काचूर झाला.

# खानापूर जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य वाटप



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** जालना येथील सामाजिक कार्यकर्ते स्व. गजानन तौर यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त खानापूर ता. जाफ्राबाद येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गजानन तौर मित्र मंडळाचे कृष्णा तायडे यांच्या वतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी शाळा समितीचे अध्यक्ष विश्वास शेळके सदस्य ऋषींद्र शेळके, कौतिक तायडे, रामदास शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वही पेन व उजळणी पुस्तकाचे वाटप करण्यात आले. यावेळी सुहास शेळके, मंगेश शेळके, विजय शेळके, निवृत्ती शेळके, रामु शिंदे, गणेश तायडे, नागेश तायडे, पवन तायडे, योगेश शेळके निलेश तायडे, मारोती शेजुळ, योगेश शेळके, मारोती शेळके, रामू शेळके, दिपक शेळके, अंकुश बरडे, मुख्याध्यापक विनोद कळंबे, दिनेश डोईफोडे उपस्थित होते.

# अधिकाराचे किल्ले ताब्यात असले तर भय बाळगण्याचे कारण नाही...

## ७९ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजी नगर । प्रतिनिधी -** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने ८ डिसेंबर २०२४ ला संस्थेचे जनसंपर्क कार्यालय साकेतनगर येथे ७९ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला उद्घाटनपर मार्गदर्शन करताना फुले आंबेडकर स्टडी सर्कलचे प्रचारक अरविंद खैरनार म्हणाले की, समाजातील काही जणांची परिस्थिती बदलली असली तरी बहुतांश सामान्यांची स्थिती वाईटच आहे. सामाजिक क्रांतीसाठी फुले आंबेडकरांचे मार्गदर्शन प्रेरणादायी आहे. रामजी बाबा जिथे नोकरीला होते तिथेच फुल्यांनी त्या काळात दोन दिवसीय वैचारीक प्रबोधनात्मक प्रशिक्षण शिबिर घेतल्याचा इतिहास उपलब्ध आहे. ज्यामुळे रामजी बाबा मार्फत भीमरावांना जोतिबा फुले कळाल्याने त्यांनी फुल्यांना गुरू मानले आहे.

याप्रसंगी टी. एन. थोरात म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञान हेच आपले भांडवल असून शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे स्पष्ट केले आहे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, कुठलाही निधी इतरत्र न वळविता ज्या कामासाठी जमा केला त्याच कार्यासाठी वापरला पाहिजे. प्रतीक पंचशील म्हणाले की, संस्था चालविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर असते, तिथे होणारी निवड म्हणजे मा-याच्या जागा असून त्यामुळे समाजाचा विकास करण्याची संधी मिळते. आपण सुट, बुट, टॉय, कोटात राहण्यासाठी एखाद्या कार्यशाळेचे आयोजन केले पाहिजे. अतिष बस्ते म्हणाले की, आदर्श महापुरुषांचा शैक्षणिक वारसा जपला पाहिजे. आपले कैडर्सयुक्त वर्तन असावे. महादेव डांबरे म्हणाले की, शिक्षण हे वाघिणीचे दुध असले तरी आपणास तार्किक शिक्षण मिळत नसल्याने ते तकलादू ठरत आहे. पुणे करारान्वये हक्क अधिकार गमवावे लागल्याने आपले प्रतिनिधी निष्क्रिय ठरत आहेत. राहूल मेश्राम म्हणाले की, शिक्षण हे वाघिणीचे दुध असले तरी ते सहजासहजी उपलब्ध होत नाही.

प्रमुख वक्ते इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, आपण फुले आंबेडकरांसारखे तात्विक शिक्षण घेतले पाहिजे. आपल्या समाजातील प्रत्येक खेडेच नव्हे तर प्रत्येक घर सुद्धा एक दक्षिण आफ्रिका आहे. बुद्ध धम्मात तर्कहीन विचाराला थारा नसल्याने भक्तांना किंमत नाही. करिता शिक्षणात तडजोड न करता गुरगुरायला लावणारे शिक्षण घेतले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, आता नौक-यांचा जमाना संपत आल्याने बदलत्या काळानुसार व्यवसायाकडे वळतांना विधायिका, कार्यपालिका, न्यायपालिका व मेडिया सह सर्व क्षेत्रातील मा-याच्या जागा हस्तगत केल्या पाहिजेत. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ डिसेंबर १९४५ ला मनमाड येथे वस्तीगृहाच्या कोनशिला प्रसंगी अस्पृश्य विद्यार्थ्यांसमोर मार्गदर्शन करताना शिक्षणाशिवाय मा-याच्या जागा काबीज करता येणार नाही हे स्पष्ट केले होते. तसेच अधिकाराचे किल्ले ताब्यात असले तर भय बाळगण्याचे कारण नाही याची जाणीव करून दिली होती. ज्यामुळे पुढील काळात अस्पृश्य समाजाने मा-याच्या जागा हस्तगत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याची व्याप्ती वाढविण्याची आवश्यकता आहे. करिता विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराप्रमाणे १८-१८ तास अभ्यास करून समस्यांवर उपाय योजना शोधल्या पाहिजेत. करिता गरीब, असहाय, होतकरू, गरजू विद्यार्थ्यासाठी १८-१८ तास अभ्यास करण्याची सोय उपलब्ध करून द्यायचा प्रयत्न सुरू आहे. तरी गरजवंत विद्यार्थ्यांनी संपर्क करावा जेणेकरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे मा-याच्या जागा हस्तगत करणारे सक्षम विद्यार्थ्यांची निर्मिती होऊ शकेल. उच्च राहणी, उच्च विचार याप्रमाणे सुट, बूट, टॉय, कोटात राहण्यासाठी स्वंतत्र कार्यशाळेची वाट पाहण्यापेक्षा आपण त्याची सुरुवात केली पाहिजे.




या कार्यशाळेचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, अरविंद खैरनार, राहूल मेश्राम, प्रतीक पंचशील, उद्योजक मिलिंद बागूल, अतिष बस्ते, इंजिनिअर किशोर पाटील, टी. एन. थोरात इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

# राजस्थान येथून निघालेल्या 'समाज जोडो यात्रेचे' मारवाडी समाजाकडून शहरात स्वागत

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** समाजाच्या आर्थिक रक्तवाहिन्या म्हणून ओळख असलेला मारवाडी समाज जगभर पसरलेला आहे. तो एकत्र यावा, समाज बांधवांची एकमेकांशी ओळख व्हावी यासाठी राजस्थान मधील खंडेला येथून समाज जोडो यात्रा निघाली आहे. ही रथयात्रा गुजरातमार्गे महाराष्ट्रात आली असून गुरुवार, १२ डिसेंबर रोजी जाफ्राबाद शहरात दाखल झाली. यावेळी शहरातील खंडेलवाल समाजाच्या कार्यकर्त्यांनी या यात्रेचे भव्य स्वागत केले. खंडेलवाल समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते कैलासचंद्र खंडेलवाल, अनिलकुमार खंडेलवाल, महेशकुमार खंडेलवाल, नंदकुमार मेठी, संजय खंडेलवाल, संजय मेठी यांच्या पुढाकाराने आलेल्या राजस्थानच्या कार्यकर्त्यांचे श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्याच्या आतिशबाजीत स्वागत करण्यात आले. याप्रसंगी जाफ्राबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे, पीएसआय तायडे हे सुद्धा उपस्थित होते. ही रथयात्रा शहराच्या मुख्य रस्त्याने बालाजी मंदिरात सवाद्य नेण्यात आली.

मंदिरात मुख्य अतिथींचे स्वागत झाल्यानंतर त्यांनी या यात्रेचा मुख्य उद्देश सर्वासमोर समजावून सांगितला. कार्यक्रमासाठी मारवाडी समाजाचे महिला, पुरुष, बालक उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता सर्वांना स्नेहभोजन देऊन करण्यात आली

# 'घर घर संविधान' माणगाव तालुक्याचा आदर्श पॅटर्न बनवा - श्रीमती सुरेखा तांबट

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** 'भारतीय 'संविधान' हा प्रत्येक भारतीय नागरिकाचा प्रतिष्ठापूर्वक तथा सन्मानजनक जीवन जगण्याचा आधार आहे. भारतीय संविधानाचे महत्व अनेक स्तरांवर असून त्यात आपला देश सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडवण्याचा व देशातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय देण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. संविधान हे एक जीवंत दस्तावेज असून ते देशाच्या विकासात आणि नागरिकांच्या गुणवत्तेत महत्वपूर्ण भूमिका निभावते. असे महत्वपूर्ण दस्तऐवज त्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त घराघरात जाऊन त्याचे मूल्य प्रत्येकाला कळावे, म्हणून शासनाने 'घर घर संविधान' हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यासंदर्भात १० ऑक्टोबर रोजी एक निर्णय निर्गमित केला आहे. त्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी माणगाव (जि. रायगड) तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये करण्यात येऊन 'घर घर संविधान' हा उपक्रम नाविन्यपूर्ण पद्धतीने राबविण्यासाठी प्रयत्न केले जातील', असे प्रतिपादन श्रीमती सुरेखा तांबट गटशिक्षणाधिकारी माणगाव यांनी 'घर घर संविधान' ह्या उपक्रमाबाबत घेण्यात आलेल्या बैठकी दरम्यान केले. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात माणगाव तालुक्यातील सर्व शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख व साधन व्यक्तींची बैठक घेण्यात आली. या बैठकीत 'घर घर संविधान' ह्या उपक्रमाबाबत माणगाव तालुक्याचा एक आदर्श पॅटर्न बनवण्यासाठी विविध उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. या दरम्यान तीन नाविन्यपूर्ण उपक्रम चालू शैक्षणिक वर्षात राबविण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला.

तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमधील सर्व शिक्षकांना दोन टप्प्यांत संविधानाविषयी मार्गदर्शन केले जाईल. हे मार्गदर्शन मिळालेले शिक्षक आपापल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील व विद्यार्थी आपापल्या परीने घरी ऐकलेले सांगतील...'घर घर संविधान'. याबाबतीत येत्या १८ तारखेला दोन सत्रात संपूर्ण तालुक्यातील शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.



शालेय परीपाठात दररोज प्रास्ताविका वाचन केले जाते. परंतू त्याचा अर्थ सर्वांना समजतोच, असे नाही. अशा वेळी प्रास्ताविका वाचनानंतर त्यातील प्रत्येक शब्दाचा संविधानातील अनुच्छेदानुसार अर्थ सांगणाऱ्या एक मिनिटांच्या लेखमालेचे दररोज वाचन केले जाईल व नंतर ती पोस्ट सर्व पालकांच्या गृप वर पाठवण्यात येईल. यासंदर्भात १८ तारखेच्या शिक्षक मार्गदर्शनावेळी सर्वांना सुचना देण्यात येणार असून येत्या १९ तारखेपासून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

सत्रसमाप्ती पुर्वी जे वरील दोन उपक्रम घेतले जाणार आहेत, त्यांची फलश्रुती तपासण्यासाठी सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक व इच्छुक पालकांची एक चाचणी घेतली जाईल.

उपरोक्त उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गटशिक्षणाधिकारी मॅडमांच्या अध्यक्षतेखाली तालुका स्तरावर एक 'घर घर संविधान समिती' स्थापन करण्यात आली असून त्यात कुमार खामकर, धुळदेव कोळेकर, शंकर शिंदे व नुरखाँ पठाण यांचा समावेश आहे. तसेच या समितीने घेतलेल्या निर्णयांची माहिती व अंमलबजावणी संपूर्ण तालुक्यातील संबंधित शाळा, विद्यार्थ्यांकडून करून घेण्याची जबाबदारी सर्व केंद्र प्रमुख व साधन व्यक्तींवर सोपविण्यात आलेली आहे.

'घर घर संविधान' ह्या शासन निर्णयानुसार अशी नाविन्यपूर्ण उपक्रमांनी अंमलबजावणी करणारा माणगाव हा राज्यातील एकमेव तालूका ठरून तो राज्याला मार्गदर्शक ठरावा, अशी अपेक्षा, यावेळी श्रीमती सुरेखा तांबट, गटशिक्षणाधिकारी माणगाव यांनी व्यक्त केली.

श्री दत्त जयंती निमित्त ह भ प श्रीकृष्ण महाराज शिंदे शहापूरकर यांचे हरी किर्तन

# राजकारणाच्या माध्यमातून समाजसेवा करता आली हे माझे सौभाग्य - आ बबनराव लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** माझा जन्मच मुळात वारकरी संप्रदायातील कुटुंबात झाल्यामुळे माझ्यावर वारकरी संप्रदायाचे संस्कार असून नित्य नियमाने पंढरीची वारी करणारी माझे वडील, यांच्याम ुळे मी सांप्रदायाशी जोडल्या गेलो, आपल्याला ३२ अभंग पाठ असून, आपण वेळ मि ळेल तेव्हा नित्य नियमाने भजन पूजन करण्यासाठी घरच्या घरी का होईना वेळ देत असतो असे मत राज्याची माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केले




ते हरिराम नगर दैठणा ता परतूर येथे कणसे परिवाराच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून आयोजित करण्यात येत असलेल्या दत्त जयंती उत्सव कार्यक्रमाचे आयोजित ह भ प श्रीकृष्ण महाराज शिंदे यांच्या हरी किर्तन बोलत होते

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की मी, सेवेचा वसा हाती घेऊन दलित पीडित, निराश्रीतांची सेवा करत गेलो, मुळातच धर्म संस्कृतीला जोपासणारी संस्कार माझ्यात असल्यामुळे माणसांना जोडत गेलो त्यातून समाजाला न्याय देऊ शकलो विकासाची अनेक कामे मतदार संघात करू शकलो असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले

शत्रुघ्न कणसे व त्यांच्या परिवाराने त्यांच्या पाच पिढ्यापासून दत्त जयंतीची ही परंपरा सतत जोपासलेली असून कणसे परिवाराचे आपण अभिनंदन करत असून यापुढेही या परिवाराने धर्म संस्कृतीसाठी अशाच प्रकारचे उत्सव नियमितपणे आयोजित करावे असेही यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

यावेळी ह भ प श्रीकृष्ण महाराज शिंदे शहापूरकर यांनी हरी कीर्तनाच्या माध्यम ातून, सेवा धर्म, प्रपंच आदी बाबींचा उहापोहो करत प्रपंच करत असताना देव देश आणि धर्मासाठी काम करण्याची आवाहन यावेळी उपस्थित त्यांना केले त्याचबरोबर जो राजसत्ता व धर्मसत्ता या दोन्ही चा मेळ घालतो तो जीवनामध्ये यशस्वी होतो कारण राजशत्तेचा आश्रेय खूप गरजेचा असतो आणि आपण पाहतो की या भारत देशाम ध्ये कधी नव्हे ते रामराज्य अयोध्येतील श्री प्रभूराम यांचे मंदिर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहकार्यातून स्थापन झाले नारीशक्तीचा आवर्जून उल्लेख करताना महाराजांनी स्थैर्य लक्ष्मी ही केवळ नारीशक्तीमुळेच टिकून राहते असे सांगतानाच महिलांनी सासू सासरे कुटुंब यांची सेवा करावी असे यावेळी बोलताना सांगितले श्री लोणीकर हे येणाऱ्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात उच्च पदावर राहतील असेही संकेत म हाराजांनी बोलताना व्यक्त केले

या कार्यक्रमाला विविध राजकीय पक्षातील सामाजिक क्षेत्रातील धार्मिक क्षेत्रातील वैद्यकीय क्षेत्रातील व्यापारी क्षेत्रातील अनेक प्रतिष्ठित मंडळींची उपस्थिती होती.





**नाताळ किंवा क्रिसमस हा एक प्रमुख ख्रिस्ती सण असून तो दरवर्षी २५ डिसेंबर या दिवशी येशू ख्रिस्त यांचा जन्मदिन म्हणून जगभर साजरा केला जातो. ख्रिश्चन श्रद्धेनुसार नाताळ हा सण १२ दिवसांच्या 'ख्रिसमस्टाईड' नावाच्या पर्वाची सुरुवात करतो. या सणानिमित्ताने जगभरात चर्च ला रंगरंगोटी करुन सजविल्या जाते. जालना शहरातील शहरातील चर्चला रंगरंगोटी करण्यात आली.**
**(छाया/जावेद तंबोली)**




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.